जा. कं. मुंपम/आस्था/1015 /2015,
सहयोगी अधिष्ठाता यांचे कार्यालय,
मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय,
परळ, मुंबई – 12.
दिनांक : 13 MAR 2015

प्रति,

मा. संचालक,
विस्तार शिक्षण,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – 440001.

**विषय:** **मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई अंतर्गत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) तसेच वाहनचालक आणि ट्रॅक्टर ड्रायव्हर/मशीन ऑपरेटर रिक्त पदांवर अकरा महिन्याकरीता एकत्रित पारिश्रमिकावर नियुक्ती करण्याकरीता जाहिरात पुनश्चः प्रसिध्द करण्याबाबत......**

संदर्भ: 1. विद्यापीठ पत्र कं. मपमविवि/आस्था–2/(72)/3019/2014, दि. 19/11/2014
2. विद्यापीठ पत्र कं. मपमविवि/आस्था–2/(72)/3239/2014, दि. 02/12/2014
3. विद्यापीठ पत्र कं. मपमविवि/आस्था–2/(54/1)/3481/2014, दि. 15/12/2014

महोदय,

उपरोक्त विद्यापीठाच्या संदर्भाधीन पत्रान्वये कनिष्ठ अभियंता (विद्युत) या रिक्त पदाच्या पोटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) – (1 पद) तसेच वाहनचालक – (2 पदे) आणि ट्रॅक्टर ड्रायव्हर/मशीन ऑपरेटर (1 पद) या एकुण 04 रिक्त पदावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात अकरा महिन्याकरीता एकत्रित पारिश्रमिकावर नियुक्ती करण्याबाबत मंजूरी देण्यात आल्यानुसार सदरील पदे भरण्याकरीता या महाविद्यालयाच्या जाहिरात कं. मुंपम/आस्था/582/2015, दिनांक 11/02/2015 अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, या महाविद्यालयातील निवड समितीने सदरची जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबाबत सूचित केले आहे. त्यामुळे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) तसेच वाहनचालक आणि ट्रॅक्टर ड्रायव्हर/मशीन ऑपरेटर या पदांची पुनश्च जाहिरात करण्यात येत असून दिनांक 09/04/2015 रोजी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार आहे.

तरी सदरील जाहीरात महाविद्यालयाच्या तथा विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी. सोबत जाहिरातीचा तपशिल जोडला असून जाहिरातीचा मसुदा इमेलद्वारे पाठविण्यात येत आहे. तरी सदरची जाहिरात वेबसाईटवर प्रसिध्द करावी, हि विनंती.

आपला विश्वासू,

सहयोगी अधिष्ठाता,
मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय

प्रत – डॉ. डी. पी. कदम, सहाय्यक प्राध्यापक यांना प्राध्यापक, पशुवैद्यकिय विकृतीशास्त्र विभाग, मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, परळ, मुंबई यांच्या मार्फत माहिती व पुढील कार्यवाहीकरीता रवाना.

**मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, परळ, मुंबई – १२.**
(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर)

---

जा. क्र. मुंपम/आस्था/ 1014 /2015, दिनांक 13 MAR 2015

# जाहिरात

उपरोक्त संदर्भाधीन विद्यापीठ पत्रान्वये मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई येथील आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या रिक्त पदाच्या पोटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), वाहनचालक आणि ट्रॅक्टर ड्रायव्हर/मशीन ऑपरेटर अशी खालील प्रमाणे एकुण चार रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात अकरा महिन्याकरीता एकत्रित पारिश्रमिकावर भरण्याकरीता उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखतीकरीता दिनांक 09/04/2015 रोजी ठिक सकाळी 11.00 वाजता सहयोगी अधिष्ठाता, मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, परळ, मुंबई – 400 012 येथे उपस्थित राहावे.

| अ. क्रं. | पदाचे नांव | पदांची संख्या | एकत्रित पारिश्रमिक वेतन | शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 1 | रु. 27512/– | 1) मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी<br>किंवा<br>2) शासन मान्यता प्राप्त असलेल्या तीन वर्षे कालावधीची स्थापत्य अभियांत्रिकी प्रथम श्रेणीतील पदविका.<br>3) स्थापत्य अभियांत्रिकी मधील अनुभव असल्यास प्राधान्य<br>4) संगणकाची MS-CIT/DOEACC/CCC परिक्षा उत्तीर्ण<br>5) वयोमर्यादा – किमान 18 वर्षे व कमाल 33 वर्षे खुल्या प्रवर्गासाठी आणि 38 वर्षे मागास प्रवर्गासाठी |
| 1 | वाहनचालक | 02 | रु.14473/– | 1) आठवा वर्ग उत्तीर्ण<br>2) एस. एस. सी. परिक्षा उत्तीर्ण असल्यास प्राध्यान्य<br>3) हलके व जडवाहन चालविण्याचा शासनमान्यता प्राप्त परवाना तसेच बस बॅच आवश्यक<br>4) वयोमर्यादा – किमान 18 वर्षे व कमाल 33 वर्षे खुल्या प्रवर्गासाठी आणि 38 वर्षे मागास प्रवर्गासाठी |
| 2 | ट्रॅक्टर ड्रायव्हर/मशीन ऑपरेटर | 01 | रु.14473/– | |

सदरील पदांवरील नियुक्त्या या तात्पुरत्या स्वरुपात असून अकरामाही कालावधीनंतर सदरील सेवा समाप्त केल्या जातील. सदरील पदासाठी वरील शैक्षणिक अर्हता पूर्ण करण्या–या इच्छुक उमेदवारांनी वैयक्तीक संपूर्ण माहिती तसेच शैक्षणिक अर्हता व इतर प्रमाणपत्राच्या मुळ व छायांकित प्रती सोबत उपस्थित राहावे. मुलाखतीस उपस्थित उमेदवारांच्या संख्येनुसार लेखी परिक्षा घेण्याबाबतचा निर्णय प्रशासनास राहील. मुलाखतीच्या कार्यक्रमात अंशतः बदल करणे किंवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई तथा महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत.

सहयोगी अधिष्ठाता,
मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय
आस्थापना